# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 265/2023 दिनांक : 08.07.2023

## 1)घरफोडी :–

**1)विमानतळ :–** दिनांक 05.07.2023 रोजी चे 09.00 ते दिनांक 06.07.2023 चे 19.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घर शिवनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे राहाते घराचे दाराचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने कडी कोंडा तोडुन आत मध्ये प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले 1,15,000/–रूपये व दुकानातील गल्यातील नगदी 30,000/–रूपये, शाऊमी कंपणीची एलईडी टी व्ही 32 इंची जुना वापरती असे एकुण 1,55,000/–रू चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी रत्नदीप राजाराम लोहार, वय 31 वर्षे, व्यवसाय फोटोग्राफर रा. शिवनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 228/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गोंड, मो.क्रं. 7972560742** हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 03.07.2023 रोजी चे 15.00 ते दिनांक 07.07.2023 चे 09.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी सराफा कॉर्नर गांधी चौक भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा घराला कुलूप लावुन त्यांचे मेंहुणीचे घरी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने सोन्या चांदीचे दागीने व नगदी तीस हजार रूपये असा एकुण 1,08,000/–रूपयाचा ऐवज अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी विजयकुमार गंगाधर तेलंगे, वय 37 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सराफा कॉर्नर गांधी चौक भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 243/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पाटील, मो.क्रं. 9850550670** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**1)वजिराबाद :–**दिनांक 05.07.2023 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **खडकपुरा नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे पलॉटवर बांधकाम करण्याचे साहीत्य टाकण्याचे कारणावरून आरोपीतांनी संगणमत करून शिवीगाळ करून लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यात मारून गंभीर दुखापत केली व फिर्यादीचे आईस लाथा बुकयानी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मोहम्मद मुन्नवर पि. मोहम्मद युनूस, वय 36 वर्षे, व्यवसाय मेकॅनिक रा. खडकपुरा नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 264/2023 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्रीमती गिरे मॅडम, मो. नं. 8411835457** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 2020 ते आज पावेतो, **फिर्यादीचे माहेरी व सासरी पळसगाव ता. वसमत जि. हिंगोली व बरकतपुरा अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तुला स्वयंपाक बनवता येत नाही, तुझे माहेरहहुन किराणा दुकान टाकण्यासाठी वीस हजार रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व थापडा बुक्याने मारहाण करून फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 35 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 227/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1396 आडे, मो.क्रं. 9823151396** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर :–** दिनांक 01.09.2019 पासुन ते दि.10.05.2023 चे दरम्यान वेळ नक्की नाही, **मौ. टेम्बुरदरा ता. उमरखेड जि. यवतमाळ ह. मु. कौठा तांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु आम्हाला पसंत नाही, तुला स्वयपाक येत नाही, आम्ही पुसद येथे प्लॉट घेतला आहे. त्यासाठी दोन लाख रूपये माहेरहुन घेऊन ये म्हणुन शिवीगाळ व थापडा बुक्याने मारहाण करून फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 143/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/कदम, मो.क्रं. 7350671239** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**लोहा :–** दिनांक 05.07.2023 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **कंधार ते लोहा जाणाऱ्या रोडवरील बेनाळ पाटीच्या अलीकडे कॅनॉल जवळ पोलीस स्टेशन पासुन 8 किमी अंतरावर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दिगांबर दगडु कदम, वय 43 वर्षे, रा. शेलगाव(धानोरा) ता. लोहा जि. नांदेड** हा चालवत असलेल्या लुनाला यातील ॲटो क्रमांक एमएच–22/यु–3657 चे चालकाने त्याचे ताब्यातील ॲटो हयगय व निष्काळजीपणे चालवुन मयताचे लुनाला जोराची धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. पाच ते सहा लोकांना गंभीर जखमी करून लुनाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी ताईबाई दिगांबर कदम, वय 40 वर्षे, व्यवसाय घरकाम व शेती रा. शेलगाव (धानोरा) ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं. 158/2023 कलम 279, 337, 338, 304(अ), 427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सोनकांबळे, मो.क्र. 9823867336** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 07.07.2023 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **सखाराम शेषेराव कदम यांचे हॉटेल समोर नांदेड ते मालेगाव जाणारे रोडवर डौर शिवारात ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे देगाव कु येथील वसुली करून सखाराम शेषेराव कदम यांचे हॉटेल समोर नांदेड ते मालेगाव जाणारे रोडवर थांबले असता यातील आरोपीने फिर्यादीस तु मागील सहा महिन्याखाली माझ्या मिटरमध्ये छेडछाड केल्यामुळे दंड का आकारला म्हणुन फिर्यादीस जमिनीवर पाडुन डोक्यात व गालावर लाथा बुक्यानी मारहाण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवुन शासकीय कामता अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी साईप्रसाद पोतन्ना मदवे, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी (तंत्रज्ञ) महावितरण शाखा कार्यालय मालेगाव रा. कासारखेडा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 226/2023 कलम 353, 332, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री राठोड, मो.क्र. 9823143245** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**वजिराबाद :–**दिनांक 07.07.2022 रोजी चे 22.05 वा. चे सुमारास, **हिंगोली गेट ते रेल्वेस्टेशनकडे जाणारे रोडवर रेल्वे कॉर्टरसच्या बाजुस नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने हिंगोली गेट ते रेल्वेस्टेशनकडे जाणारे रोडवर रेल्वे कॉर्टरसच्या बाजुस रोडवर बिना परवाना बेकादेशिररीत्या एक लोखंडी खंजर किंमती 500/–रू चा ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/मनोज बापुसिंह परदेशी, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 265/2023 कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/11 सोनटक्के, मो.क्र. 8805007511** हे करीत आहेत.

## 7)गळफास घेवुन आत्महत्या :–

**माळाकोळी :–**दिनांक 07.07.2023 रोजी सकाळी 09.00 ते 14.00 वा. चे दरम्यान, **रिसनगाव शिवार ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे मुक्ताजी खंडेराव हाबघुंडे, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. रिसनगाव ता. लोहा जि. नांदेड,** यांनी सततची नापिकीस व कर्जास कंटाळुन गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार रंगनाथ खंडेराव हाबघुडे, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. रिसनगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे माळाकोळी** आ. मृ. **11/2023** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1188 क्षिरसागर, मो.नं. 9881201052** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड